श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ७ वें ] [ अंक १२.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका:

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

८५

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... | १—८ |
| श्रीसद्गुरु सांईनाथ महाराज यांचे चमत्कार ... | ९—१० |
| शके १८५२ पुण्यतिथि उत्सवाचा अहवाल ... | १—१६ |
| शके १८५२ संस्थान शिर्डी येथील श्री सांईनाथ महाराजाचे गुरुपौर्णिमेबद्दल खर्चाचा जोड. ... | १७—२१ |
| शके १८५२ श्रीरामजयंतीच्या उत्सवाचा अहवाल .. | २२—३० |


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावली** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" ही टीका श्री साई लीलेच्या ४—५ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

ही टीका सुमारें साठ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली होती, आणि आजमितीस हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला आहे. तरी ग्राहक याचा फायदा घेऊन ऋणी करतील अशी आशा आहे.

व्यवस्थापक—**श्रीसाई लीला**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड

—प्रकाशक.

# अनुभव

-:०:-

" बाबा ! तुम्ही हें भलतें भलतें काय लिहिले आहे ? म्हणे पटकी वगैरे क्षुद्र दैवतें आहेत तीं ! आणि म्हणें तीं दिसतात ! अशा लेखांनीं लोकांची दिशाभूल होण्याचा संभव आहे. तुम्ही प्राणिशास्त्राशचा ( Biology ) उत्तम अभ्यास केला आहे, पहिल्या प्रतीचें सूक्ष्मदर्शक यंत्र शास्त्री ( microscopist ) आहांत, पूर्णपणें जाणतां कीं, पटकीचे जनक एक विशिष्ट प्रकारचे जंतु ( Germs ) आहेत; आणि हें काय ? कीं पटकी म्हणे एक क्षुद्र दैवत आहे ! "

हा भडिमार एका आधुनिक तरुण डॉक्टरानें श्री साईलीलेंतल्या चालू सालच्या ३--४ अंकांतील मजकूर वाचून अत्यंत आश्चर्य व संतापयुक्त शब्दांनीं लेखकावर केला. तेव्हां पुढील प्रकारचा संवाद झाला.

तो तरुण गृहस्थ म्हणाला " वाखा एक प्रकारच्या जंतूपासून होतो ना ?"

लेखक म्हणाला " होय. "

" तर मग ती म्हातारी शिवेंच्या ओढयाजवळ बसून कालवाल करीत होती हें काय ? "

" हें वाक्य उघड दाखवितें कीं, वाखा उत्पन्न करणारे जंतु त्या वेळीं शिवेंच्या ओढयावर पूर्णपणें तयार झाले होते. मग ते कोणा वाख्याच्य वाटसरूचे कपडे त्या पाण्यांत धुतल्यामुळें किंवा इतर कारणानें असोत. "

पाटाचें पाणी येण्यापूर्वी पटकीची सांथ शिरडी गांवांत श्री रामनवमीच्या उत्सवानंतर उत्पन्न होत असे. त्या वेळीं लेंडी ओहोळांत पाणी मुळींच नसल्यामुळें कपडे वगैरे शिवेंच्या ओढयांत धुण्यांत येत असत.

" हे वाळ्याचे जंतु उत्पन्न झाल्याचें श्री साईबाबांना त्यांच्या अंतर्ज्ञानानें कळत असे आणि त्याप्रमाणें ते योग्य ते इलाज करीत असत." असें लेखक म्हणाला.

" तर मग दळलेलें पीठ त्या पाण्यांत टाकल्यानें त्या वाळ्याच्या सांथीचें शांतवन कसें होईल ? ! "

" गड्या ! हा जो तूं प्रश्न विचारलास त्याचें योग्य तें उत्तर देण्याचें सामर्थ्य माझ्यामध्यें खास नाहीं. तरी तूं डॉक्टर आहेस सबब मला जें वाटतें तें तुला कळावें. वाळ्याच्या जंतूंवर इलाज म्हणजे त्याच जंतूंचें विशिष्ट प्रकारचें कल्चर अथवा लस तयार करतात ना ? "

" होय. " तो तरुण गृहस्थ म्हणाला.

" हें कल्चर अथवा लस काय वस्तु आहे ? "

" कालऱ्याच्या रोगाचे जंतु एका कांजीसारख्या पदार्थांत घालतात, जेणेंकरून त्या जंतूंची थोडया वेळांत मनस्वी वृद्धि होऊन त्याच जंतूंपासून असें एक द्रव्य उत्पन्न होतें कीं, त्यामुळें त्या सर्व जंतूंचा आपण होऊन नाश होतो. हें जेव्हां होतें तेव्हां तें तशा प्रकारचें कल्चर अथवा लस शरीरांत टोंचली असतां पटकीच्या जंतूंचें त्यामुळें कांहीं चालत नाहीं. "

" हें तूं थोडक्यांत योग्य रीतीनें सांगितलेंस तर बाबा शिवेच्या ओढयांत तें दळलेलें पीठ टाकीत असत त्या पिठाचें थोडया काळांत त्या उष्ण हवेंत कल्चर अथवा लस होऊन ती त्या पटकीच्या जंतूंच्या नाशाला कारणीभूत व्हावी कीं नाहीं ? "

तो म्हणाला हें " संभवनीय आहे खरें. "

तेव्हां लेखक म्हणाला " बाबांचें सर्व करणें आपल्यासारख्या सामान्य मनुष्यांच्या आटोक्याच्या फारच पलीकडचें आहे. तरी पण सध्यांच्या शोधांच्या ज्ञानामुळें जितकें कांहीं आपल्याला समजलें तितकें समजून घेण्याची जिज्ञासा ज्यानें त्यानें यथाशक्तीप्रमाणें ठेविली पाहिजे.

याप्रमाणें पीठ टाकल्यामुळें त्या पटकीरूपि शक्तीचें समाधान होऊन 'मी पराड मुडदे पाडीन' या धमकीपासून तिला मुक्त केलें असें म्हणतां येईल. "

तेव्हां तो म्हणाला " तें सगळें खरें, पण ही पटकी म्हणजे क्षुद्र दैवत याचा काय उलगडा ? "

लेखक म्हणाला " पाहा बुवा ! मी एक अत्यंत अल्पबुद्धि आहे. परंतु पटकी, वाखा वगैरेचे जे विशिष्ट जंतु आहेत त्या जंतूंमध्यें तोच रोग उत्पन्न करण्याचें सामर्थ्य अथवा शक्ति आहे ना ? "

" होय. "

" तर मग या शक्तीला विशिष्ट रूप देऊन ती शक्ति एक क्षुद्र दैवत आहे असें मानणाराचें चुकतें कोठें ? "

" तुम्ही काय बोलतां तें बरोबर समजत नाहीं. "

" हें पाहा ! तूं ईश्वराचें अस्तित्व मानतोस काय ? "

" होय. "

" कशावरून ? "

" हीं जीं आपण अनेक ब्रह्मांडें पाहातों त्यांचा चालक कोणीतरी असला पाहिजे. "

" बरें. तो सूत्रधार गस्टेव्ह डोरेनें चितारलेल्याप्रमाणें ढगांमध्यें बसलेला कोणीतरी शुभ्र दाढी व शुभ्र केशयुक्त असा एक अत्यंत वयोवृद्ध मनुष्यरूपि इसम आहे काय ? "

"मनाला तशी व्यक्ति पटत नाहीं. प्रभूच्या अनंत तऱ्हांच्या शक्तींना निर्माण झालेल्या दृश्य क्रियांवरून असा अनुभव येतो कीं, त्याची शक्ति अत्यंत प्रचंड, कल्पनातींत, न आदि न अंत अशी आहे. "

" असें जरी आहे तरी तो सर्वसामर्थ्ययुक्त परमात्मा अत्यंत प्रेममय आहे अशी पण खात्री होते. आणि ती कशावरून ? "

" मनाच्या अनुभवावरून "

" तें कसें ? "

" संकट पडलें असतां त्याची प्रार्थना केल्यावर समाधान वाटून मन प्रफुल्लित होतें त्यावरून."

" असें जर आहे तर भक्ति केल्यानें परमेश्वर प्राप्त होईल काय ?"

" होय."

" हें साधतांना भक्तानें परमेश्वराच्या एखाद्या गुणावर लुब्ध होऊन त्याप्रमाणें त्याची बाह्य अथवा मनांत आकृति कल्पून, त्याप्रमाणें तो आपणाला दिसावा, प्राप्त व्हावा, अशी अत्यंत उत्कंठेनें भावना अथवा कल्पना केल्यास, आणि ठेवल्यास, त्याचें तसें करणें चुकीचें होईल का ? "

" नाहीं. "

" तर मग जो कल्पनातीत आणि अगम्य, परंतु परमकारुणिक व प्रेममय, अशा त्या प्रभूची भक्ति करण्यासाठीं त्याच्यावर प्रेम ठेवण्याकरितां आपल्या मनाच्या उच्चतम कल्पनेप्रमाणें त्याला योग्य तें मोहक रूप मनांतून देणें व ठेवणें हा एक साधा आणि सरळ उपाय आहे ना ?"

" होय."

" हें सर्व करण्याचें प्रयोजन परमेश्वराची जी अफाट लीला आपण पाहात असतों त्यामुळें ना ?"

" होय "

" सर्व शक्तिमान् प्रभूच्या अगाध लीलेपुढें पटकीचा अथवा वाऱ्याची लीला ही एक अत्यंत क्षुद्र लीला आहे ना ? म्हणून हीं अनंत कोटि ब्रम्हांडें उत्पन्न व लय करणारा श्री जगदात्मा हें पूर्ण दैवत आण

पटकी वगैरे त्याच्या क्षुद्र शक्तींचीं प्रदर्शनें अथवा क्षुद्र लीला, ही त्याचींच क्षुद्र दैवतें."

"पण तिला स्वरूप कसें?"

"देवाला स्वरूप कसें? ज्याप्रमाणें आतुर भक्त सुरवातीला आपल्या प्रेमभावनायुक्त कल्पनेनें आपल्या मनांत त्या कल्पनातीत अरूपाला रूप देतो; त्याच भावनेनें परिप्लुत होऊन त्या गुणातीताचें गुणगान गात असतो. श्वासोच्छ्वासाबरोबर त्या अनाम्याचें नाम घेत असतो, त्याप्रमाणें साधारण मनुष्य त्या पटकीरूपि सांथीला रूप देतो.

श्री साई बाबांनीं त्यांच्या भक्तांना त्यांच्या त्यांच्या इष्ट दैवतांचीं रूपें दाखविल्याचें तुला ऐकून माहीत आहेच. त्याच प्रमाणें पटकी हें एक क्षुद्र दैवत आहे अशी जी तुझ्या आईची आणि धाकटया भावाची समज, त्या समजुतीप्रमाणें बाबांनीं त्यांना पटकीरूपि दैवताचें साक्षात् रूप दाखविलें हें खरें आहे."

ही गोष्ट १९१७च्या वैशाखांत घडली. त्या वेळीं वरील वर्णन केलेल्या बाई व त्यांचा धाकटा मुलगा श्रीसाई बाबांच्या दर्शनासाठीं शिरडीला गेलीं होतीं. एके दिवशीं माध्यान्हीची आरती झाल्यावर श्री साईबाबा त्या मुलाला म्हणाले "भाऊ! आज बरोबर तीन वाजतां माझ्यापाशीं ये, माझे पाय चेपीत बस आणि ते मुळींच सोडूं नकोस!"

त्याप्रमाणें तीं दोन्ही मायलेंकरें बाबांच्याकडे गेलीं. तो मुलगा बाबांचे पाय चेपीत होता. बाबा त्याला पुन्हा म्हणाले "भाऊ! माझे पाय सोडूं नकोस!" इतक्यांत एक अक्राळविक्राळ चर्येची स्त्री—जिच्या झिंज्या सुटलेल्या आहेत, कपाळ व तोंड मळवटीनें भरलेलें आहे, जीभ कुत्र्याप्रमाणें तोंडाबाहेर लळलळत आहे, अशी कोठून तरी मशीदीच्या पायऱ्यांवर धाडकन उडी टाकून आली, आणि तेथून लगेच श्री साईबाबांच्या

पायांपाशीं तो मुलगा बसला होता तेथें टुण्णकन उडी मारून, त्याचा एक हात धरून त्याला ओढूं लागली, आणि म्हणाली " हा मला पाहिजे " बाबा म्हणाले " त्याला मी देत नाहीं. "

ती म्हणे " हाच पाहिजे. " असें म्हणून त्याला खेचूं लागली.

हा प्रकार कांहीं वेळ चालला. सरतेशेवटीं बाबा अत्यंत क्रोधयुक्त होऊन, एका हातानें त्या मुलाला पकडून उभे राहिले आणि तिच्या छातींत एक लाथ दिली. त्याबरोबर ती आकृति एक आरोळी मारून सभामंडपांत उडाली आणि तेथून नाहींशी झाली.

बाबा त्यानंतर खालीं बसले, आणि त्या मुलाला म्हणाले " भाऊ! सावध आहेस ना ? ती कोण आली होती तें तुला ठाऊक आहे काय ? अरे ! ती आवा तुला मागत होती; पण मी तुला कसा देऊं देईन !"

तो मुलगा म्हणतो हा प्रकार चालत असतांना मी एखाद्या चित्राप्रमाणें बसलों होतों. सर्व प्रकार डोळ्यांनीं दिसत होता, पण शरीरांतली हालचाल जणूं काय दगडाप्रमाणें स्तब्धच होती !

जरी त्या दोघांच्या मनांत बरेच दिवस राहावयाचें होतें तरी ही गोष्ट घडल्याच्या दुसऱ्याच दिवशीं मोठ्या सकाळीं त्यांना तावडतोब मुंबईस जाण्याची आज्ञा झाली. ता मानून तीं दोघें त्याच दिवशीं संध्याकाळा आपल्या घरीं येऊन पोहोंचलीं आणि वडिलांना वर घडलेली हकीकत त्यांनीं सांगितली.

त्यानंतर शिर्डींत पटकीची सांथ येऊन बरींच माणसें गेल्याचें कळलें.

आधुनिक शास्त्राप्रमाणें या निरनिराळ्या सांथींच्या जंतूंचे शोध लागून त्या त्या विशिष्ट जंतूंचा त्यांच्याच कल्चरद्वारें नाश करवून ती लस उपयोगांत आणण्याचा प्रघात आहे. यामुळें आरोग्य--शास्त्राला बराच फायदा झाला आहे. खेडयापाडयांतून या सांथींचा प्रादुर्भाव न व्हावा या-

साठीं गांवाच्या दरवाज्यापाशीं मोठें थोरलें लांकूड आडवें टाकतात. जेणें-करून बाहेरच्या दूषित गांवची गाडी आंत येऊं शकत नाहीं आणि बाहेर-गांवाहून येणाऱ्या माणसांविषयीं पूछ परछ होऊं शकते. ही एक प्रकारची quarantine (क्कारंटीन) आहे.

इतकें करून ही सांथ आल्यास त्या त्या सांथीचें विशिष्ट स्वरूप कल्पून शमनार्थ जत्रा वगैरे गांवकरी करितात. या जत्रांत कोंबडीं, बकरीं यांचा संहार होत असतो. मतलब हा कीं, तीं क्षुद्र दैवतें ते भोग घेऊन, तृप्त होऊन, त्यांनीं तो गांव सोडावा.

अशा प्रकारची सेवा अथवा प्रार्थना त्या दीनदयाळ जगन्नायकाला कळून तो त्या सांथींचें उच्चाटन करवितो. तें होतांना दीनदुबळीं शरीरें त्या सांथींना बळी पडतात.

सारांश, ज्याप्रमाणें आत्मसाक्षात्कार झालेल्या पूर्ण ब्रह्मवेत्त्याला सर्व ठिकाणीं आपलें खरें रूप दिसतें, आणि तें अनुभवितां येतें, आणि त्याला तसें करतांना त्याच्या साधक अवस्थेमधल्या प्रभूच्या विशिष्ट प्रकारच्या साकार रूपाची उपासना अथवा प्रार्थना करण्याची खास आवश्यकता राहात नाहीं, त्याचप्रमाणें जंतुशास्त्राचा पूर्ण अभ्यास केलेल्या मनुष्याला, त्या त्या जंतूच्या विशिष्ट शक्तींपासून उत्पन्न होणाऱ्या सांथींचीं विशिष्ट स्वरूपें जसें मरीआई, शितळा देवी, यांची पूजाअर्चा करण्याचें कारण राहात नाहीं.

दैवी पुरुषांना अशा सांथी उद्भवण्यापूर्वी साहजिक् रीतीनें कळतात, आणि त्यांच्या प्रतिबंधनासाठीं अथवा शमनासाठीं, आणि नाशासाठीं कोणत्या प्रकारचे साधे इलाज योजावे हें देखील त्यांना पूर्णपणें ठाऊक असतें.

याचसाठीं पटकीची सांथ येण्यापूर्वी श्री साईबाबा शिंवेच्या ओढ्यावर पीठ टाकवीत. कांहीं भक्तांना विशिष्ट प्रकारचा काढा शरीरशुद्धीसाठीं देत. जेणेंकरून ती सांथ त्यांना न बाधावी. पीठ टाकल्यावर ओढ्याचें पाणी

न वापरण्याबद्दल सक्त ताकीद असे. शिवाय हा पिठाचा कांहीं तरी उतारा आहे असें मानून तें पाणी गांवकरी वापरीत नसत.

"अरे! शिवेच्या ओढयावर ती आवा माझा लई कालावाला करती. पराड मुडदे पाडीन," "मला गांवांत येऊं देरे" या वाक्यांत त्या सांथीची पूर्ण तयारी Incubation Period (इनक्युबेशन पीरिअड) शिवेच्या ओढयावर पूर्ण झाल्याचें दिसतें. म्हणून तिच्या शमनार्थ व जलदनाश व्हावा म्हणून स्वतः दळून पीठ टाकणें, भक्तांना औषधें देणें या कृतींवरून बोध होतो.

"अरे बाबांनो मरीआई येतीना! अमूक ठिकाणी गहूं दळून त्याचें पीठ टाकारे" असा जर बाबा गांवकऱ्यांना हुकूम करते तर तो हुकूम ते कधींही अमलांत आणते ना. कारण पिठासारखी जीवनासाठीं मौल्यवान वस्तु ओढयांत नेऊन फुकटच्या फाकट टाकून देणें हें त्यांना कधींही पटलें नसतें. याच कारणामुळें बाबा स्वतः दळूनकाढून पीठ टाकीत असत.

साध्याभोळ्या भक्तांना त्या त्या सांथींच्या शक्तीचें त्यांच्या त्यांच्या कल्पनेप्रमाणें तसें स्वरूप दाखविण्याचा हेतु असाच दिसतो कीं, त्याच्या मातुःश्री समक्ष त्या मुलाला, त्याप्रमाणें प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंतून काढून सोडविल्याचा जो साक्षात् अनुभव दिला, त्यामुळें त्या उभयतांचें श्रींवर बसलेलें दृढ प्रेम व श्रद्धा, या जन्मांत जी अचल झाली, ती, कदाचित् इतर प्रकारांनीं होतीना, असें या अजाण व अज्ञानी लेखकाला वाटतें, तें सूज्ञ वाचकांपुढें तो अत्यंत विनम्र भावानें सादर करीत आहे.

"म्हातारा"

# श्री सद्गुरु साइनाथ महाराज यांचे चमत्कार.

श्री सद्गुरु साई महाराजांच्या प्रथम दर्शनाचा व परिचयाचा लाभ आमचे प्रिय मित्र कै. हरीभाऊ सीताराम दीक्षित यांचेमुळें सन १९१२ सालीं झाला. ते धुळें येथें कौन्सिल इलेक्शनसाठीं यत त्या वेळीं ते आमचे-कडे येत असत व बाबांचे अद्भुत चमत्कार सांगत असत.

स्वत:स दम्याचा विकार असल्यामुळें तो महाराजांचे दर्शनानें नाहींसा होईल या भावनेनें शिर्डीस दर्शनास गेलों. महाराजांनीं फार प्रेम दर्शविलें. भक्ति बसली व रोगाचा जोरही कमी झाला. नंतर महाराजांचे भेटीस वरचेवर जाऊं लागलों, व मनास फारच आनंद वाटूं लागला. महाराजांचे उदीचेही चमत्कार, विशेषेंकरून लहान मुलांचे विकारावर बरेच वेळां अनुभवास आले.

एक वेळ सन १९१३ च्या मार्चमध्यें आमचे कनिष्ट चिरंजीवास फार जोराचा ताप आला आणि ५-६ दिवस निघाला नव्हता. शेवट डॉक्टरांनीं हात टाकले व सर्व रात्रभर आम्ही आणि ते असे दोन वाजे-पर्यंत जागत बसलों. कारण ती रात्र कठीण असें डॉक्टर म्हणाले. रात्रौ दोन वाजतां मी हताश होऊन बाहेर ओटयावर बसलों. इतक्यांत थोडा डोळा बसल्या बसल्या लागला. तों महाराजांची दिव्य मूर्ति मुलास उद लावून मजपुढें उभी राहिली, व सांगितलें कीं, " आतां काळजी करूं नका, दोन तासांनीं घाम सुटून सकाळीं मुलास आराम वाटेल. मात्र आराम वाटल्यावर त्यास मजकडे दर्शनास घेऊन या. " इतकें ऐकतांच मला जाग आली. व चमत्कार कीं, दोन तासांनी मुलास घाम सुटून सकाळीं त्यास आराम वाटला ! डॉक्टरांसही आश्चर्य वाटलें. मात्र आम्ही महाराजांची उदी रोग्यास दररोज लावीत होतों; व महाराज कृपा करतील अशी पक्की भावना होती, व त्याप्रमाणें अखेर घडून आलें.

दुसरा चमत्कार असा कीं, त्यानंतर लगेच दोन तीन दिवसांनीं ता. ८-३-१३ रोजीं शिरडीहून महाराजांचे परमभक्त व आमचे मित्र रा.रा. माधवराव देशपांडे यांचेकडून पत्र आलें त्याचा उतारा खालीं दिला आहे.

" तागाईत मजकूर पावेतों श्री समर्थ साई महाराज कुशल आहेत. आपणांस पत्र पाठविण्यास बहुत दिवस झाले, परंतु इतके दिवस महाराजांची आज्ञा झाली नाहीं. आज रोजीं असें म्हणाले कीं, " धुळें येथें मी तुझ्या सोबत्याचे घरीं गेलों होतों." तेव्हां मी म्हणालों—"माझे सोबती कोण ?"

महाराज म्हणाले " उपासनी बहालकर रावजी " अशींच अक्षरें काढलीं. " मी त्याचे घरीं वारंवार जातों तूं पत्र तरी पाठीव " यावरून आज पत्र लिहून सोबत उदी पाठविली आहे. "

तिसरा चमत्कारः—मुलास बरें वाटल्यावर १५ दिवसांनीं महाराजांचें दर्शनास आम्ही सर्व मंडळी मुलेंबाळें घेऊन गेलों. कोपरगांवीं सकाळीं लवकर गंगेंत स्नान केलें. इच्छा कीं, महाराजांचे आर्तीचे व नैवेद्याचे पूर्वी जावें. परंतु टांगेवाला टांगा नदींत सोडून गांवांत गेला. व जेऊन फार उशीरां आला. तेव्हां वाटलें कीं, महाराजांच्या आर्तीचा लाभ मिळत नाहीं. चमत्कार कीं, आरती महाराजांपुढें येतांच ते रा. माधवराव देशपांडे यांस म्हणाले कीं, " अरे जरा थांब, तो तुझा धुळेकर सोबती येत आहे. टांगेवाल्यानें त्याची खोटी केली." चमत्कार कीं, आम्हीं तेथें पोहोंचल्यावर आरती झाली व आम्हांस महाराजांचा प्रसाद इच्छेप्रमाणें मिळाला.

येथेंही एक चमत्कार घडला. आम्ही जातांच आमचे तीन मुलांपैकीं जो धाकटा आजारी होता त्यास महाराजांनीं प्रथम प्रेमानें जवळ बोलावलें व म्हणाले कीं " तूं आजारी असतांना मी धुळ्यास आलों होतों तें तुला आठवतें कां ? " तें पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें व आम्हां सर्व कुटुंबियाचें प्रेम व आनंद द्विगुणित झाला.

महाराज भक्ताकडे येतात काय, त्याचे करितां आरती थांबवितात काय आणि दया केलेल्या नेमक्या मुलास जवळ बोलावून त्यास प्रेमानें कुरवाळतात काय; हे सर्व प्रसंग ज्यांची महाराजांवर निस्सीम भक्ति आहे त्यांसच पटतील, इतरांस नाहीं. ॐ शांतिः

धुळें
ता. ९-१०-१९३० } रावजी बाळकृष्ण उपासनी

# शके १८५२ पुण्यतिथि उत्सवाचा अहवाल.

## श्रीदत्तचित्साईगुरुभ्योनमः

श्री साईलीलाकर्ते यांस:—

कृ. सा. नमस्कार वि. वि. शके १८५२ आश्विन शुद्ध १० गुरुवार ता. २-१०-३० रोजीं व त्यानंतर ३ दिवसपर्यंत श्री शिरडी संस्थानांतील श्री सद्गुरु साईबाबा महाराज यांच्या पुण्यतिथि उत्सवाचा अहवाल श्रीचरणीं प्रथम सादर करून नंतर आपणाकडे पाठवित आहे. त्यास येत्या श्रीसाईलीलेच्या अंकीं प्रसिद्धि मिळावी अशी नम्र विनंती आहे.

चालूसालचे उत्सवाची गोड कामगिरी श्री. बाबासाहेब तर्खड, श्री रावबहादुर मोरेश्वरराव प्रधानादि भक्तमंडळींनीं मजकडे दिली होती. ती मी आनंदानें पतकरिली व श्रीसाईमाउलीच्या कृपेनें ती निर्विघ्नपणें शेवटास गेली.

## बाहेरगांवची पाहुणे मंडळी

उत्सवाकरतां ठाण्याहून श्री देव, श्रीं शिरडी संस्थान ट्रस्टी हे सहकुटुंब सहपरिवार ( पुतणे चि. रा. विष्णुपंत, वसंतराव, श्रीकांत व चि. श्रीपाद ऊर्फ बाबूराव ) अगाऊच आठ दहा दिवस शिरडीस आले होते. उत्सवाचे आधले दिवशीं व उत्सव दिवसांत, इंदोरचे श्री. भास्करराव लाड सहकुटुंब सहपरिवार, येवल्याचे श्री. मोतीरामसा लालुसा क्षत्री सहकुटुंब सहपरिवार, नगरसूलचे श्री. रघुनाथराव वाटवे सहकुटुंब सहपरिवार, पिंपळगांवचे श्री. गोपाळराव देशपांडे, मुंबईचे श्री. कृष्णराव मंकीकर, श्री. राजाराम तुकाराम बोरकर, श्री. मदुसूदनराव पुरंदरे, श्री. गणपतराव धुमाळ श्री. कृष्णराव टिळू, श्री. नरहरराव फाटक, पोष्टमास्तर, डॉक्टर सावे, पुण्याचे श्री. विनायकराव हीनप, बॅरिस्टर आपासाहेब गाडगीळ, वसईचे श्री. शंकरराव प्रधान, सातारचे श्री. गजाननराव पाटणकर सब रजिस्ट्रार, वांद्र्याचे श्री. बाबासा-

हेब तर्खड, शिरडी संस्थान खजिनदार, श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे, शिरडी संस्थान जॉइंट खजिनदार, सांताक्रूझचे श्री. रावबहादुर मोरेश्वरराव प्रधान, शिरडी संस्थान ट्रस्टी, नाशिकचे सुरदास, नागपूरचे माधवराव सराफ, वगैरे भक्तमंडळी आली होती. तसेंच सौ. वहिनीसाहेब गाडगीळ ह्या उत्सवव्यवस्थेकरतां आगाऊच दोन दिवस येऊन गेल्या. उत्सवास येणार होत्या; परंतु प्रकृतिअस्वास्थ्यामुळें त्यांना येतां आलें नाहीं याबद्दल दिलगिरी वाटते. दोन दिवसांत त्यांनीं पुष्कळच कामगिरी बजावली. त्यांचे नोकर रा. सिताराम पवार यांनीं सुमारें १५ दिवस राहून हरएक प्रकारची, पण विशेषेंकरून कोठीची कामगिरी उत्तम बजावली.

## कीर्तन

जिल्हा पूर्वखानदेश ता. पाचोरें मौजे तांदुळवाडी येथील वारकरी सांप्रदायाचे कीर्तनकार हरिभक्तपरायण श्री. विश्रामबोवा हे आपल्या ६ शिष्यांसह सालाबादप्रमाणें येथें आले. त्यांचीं उत्सव दिवसांत व उत्सवदिवसानंतर शिरडीस एकंदर ८ कीर्तन झालीं. त्यांत श्रींच्या मंदिराचे माडीवर २, मंदिरा नजीक उघडया जागेंत ४ श्रींच्या मशिदींत १ व श्री. बापुराव बोरावके श्री. शिरडी संस्थान जॉइंट सेक्रेटरी यांचे बंगल्यावर १ याप्रमाणें चार ठिकाणीं मिळून आठ कीर्तनें झालीं. सर्व कीर्तनें भजनी थाटाचीं असून बोवांचे मागें सुमारें २५ टाळकरी होते. बुवांचें कीर्तन, वेदांत प्रतिपादन, भक्ति, हास्य-विनोद नम्रता, सदाचार शिक्षण वगैरे गुणांनीं युक्त असून भाविक अज्ञ जनांना व श्रद्धाळू सुज्ञ जनांना पटेल असें होतें. विशेषेंकरून बोवांचें लक्ष खेडेगांवच्या लोकांची ऐहिक व पारमार्थिक उन्नति व त्यांच्या ठिकाणीं असलेल्या दुर्गुणांचा नाश कोणत्या साधनांनीं होईल याकडे असे. आसपासच्या गांवचे पुष्कळ लोक येत असून श्रोतृसमुदाय दररोज अजमासें १००० हजारावर असे. बोवा हे मराठा जातीचे असून त्यांचें वय अजमासें

[३]४–३५ वर्षांचें असेल. बोवा चांगले वक्ते असून बहुश्रुत आहेत. बुवांचे [की]र्तनांत मुख्यत्वेंकरून श्री सद्गुरु तुकाराम महाराजांचे अभंगावरच विशेष [भ]र. गीता–भागवतांतील संस्कृत श्लोक व मराठी कवींच्या ग्रंथांतील कांहीं [श्ल]ोक क्वचित्प्रसंगीं ऐकण्यास मिळत. बोवांची भाषा व दृष्टांत शैली [त्य]ांच्या ज्ञातीस साजेशीच असे. विषय मांडणी व प्रतिपादन चांगलें असून [दृष्ट]ांतांचा सुकाळ असे. कीर्तनाचे कामीं बाबांचे भक्त व शिरडी संस्थान [ट्र]स्टी श्री. तात्या पाटील कोते शिरडीकर यांनीं पुढाकार घेऊन चांगली [म]दत केली.

## कार्यक्रम

येथें आल्यावर उत्सवाच्या मुख्य चार दिवसाचा तासातासाचा विगत-[व]ार कार्यक्रम ठरवून त्याप्रमाणें मंदिराचे आंतील भिंतीवर चिकटवून त्यास [दु]सऱ्याचे दिवशींच प्रसिद्धि दिली. तो कार्यक्रम खालीं लिहिल्याप्रमाणें—

### गुरुवार, ता. २-१०-३०

पहांटें ५ ते ६ काकड आरती ( सनईचौघडयासह )

सकाळीं ६ ते ८ चे दरम्यान रुद्राभिषेक व श्रीचे समाधीजवळ नित्याप्रमाणें सनई चौघडयाची हजेरी.

८ ते ९ भिक्षा.

९ ते ११ श्रीचे समाधीस मंगलस्नान, वस्त्रपरिधान, पंचोपचार पूजा, पुष्पहार व पुष्पशेरा अर्पण.

११ ते १ श्री. बापाजी लक्ष्मण कुळकर्णी यांचें श्री देव यांनीं खास पुण्यतिथीकरतां रचलेल्या आख्यानाचें कीर्तन

दुपारीं १ ते २ श्रीची आरती ( सनई चौघडयासह )

२ ते ४ भोजन.

४ ते ५ श्रीदेव यांचें श्रीचे समाधीपुढें श्री साईसच्चरितावरणिकाध्याय ५२ चें वाचन.

५ ते ६ श्री शिरडी संस्थान कमिटीची सभा व श्री आपा माळी यांचें श्रीचे समाधीपुढें नित्याचें पुराण.

६ ते ८ सीमोल्लंघन समारंभ व सायंकाळची आरती ( सनई चौघडयासह )

८ ते १० श्रीची चावडी व पालखीची मिरवणूक.

१० ते ११ श्रीची शेजारती. ( सनई चौघडयासह ).

११ ते २ ह. भ. प. श्री विश्राम बोवांचें कीर्तन.

## शुक्रवार ता. ३—१०—३०

पहाटे ५ ते ६ काकड आरती नित्याप्रमाणें.

सकाळीं ६ ते ८ श्रींचे समाधीजवळ सनई चौघडयाची हजेरी व रुद्राभिषेक.

८ ते ११ श्रींचे समाधीस मंगल स्नान, वस्त्रपरिधान, पंचोपचार पूजा वगैरे.

११ ते १२ श्रींची दुपारची आरती नित्याप्रमाणें.

दुपारीं १२ ते ४ फराळ, भोजन.

४ ते ५ श्री देव यांचे श्रीचे समाधींपुढें श्री साईलीलेच्या ७ वे वर्षाच्या ३–४ या जोड अंकांतील एका अनुभव गोष्टीवर पुराण.

५ ते ७ श्री शिरडी संस्थान कमिटीची अपुरी राहिलेली सभा व श्री आपा माळी यांचें श्रीचे समाधीपुढें नैतिक पुराण व सायंकाळची आरती.

७ ते १० श्रींचे रथाची मिरवणूक (पावसामुळें निघाली नाहीं).

रात्रीं १० ते ११ श्रीची शेजारती नित्याप्रमाणें.

११ ते २ हरिभक्तपरायण श्री विश्राम बोवांचें कीर्तन.

## शनिवार ता. ४-१०-३०

पहाटे ५ ते ६ काकडआरती नित्याप्रमाणें.

सकाळीं ६ ते ८ श्रीचे समाधीवर रुद्राभिषेक व सनई चौघडयाची नैत्तिक हजेरी.

८ ते ११ श्रीचे समाधीस मंगळस्नान, वस्त्रपरिधान, व पंचोपचारपूजा.

११ ते १२ श्रीची दुपारची आरती नित्याप्रमाणें.

१२ ते २ संस्थान कमिटीची अपुरी राहिलेली सभा.

दुपारीं २ ते ३ ब्राह्मण भोजन.

३ ते ६ सोनार, मारवाडी, शिंपी, मराठे वगैरे मंडळींना भोजन.

६ ते ७ संस्थान कमिटीची सभा. श्री.आपा माळी यांचें पुराण, सायंकाळची नैतिक आरती.

७ ते १० श्रींचे रथाची मिरवणूक.

रात्रीं १० ते १ ह. भ. प. श्री विश्राम बोवांचें कीर्तन.

**रविवार** ता. ५-१०-३०

पहांटे ५ ते ६ काकडआरती नित्याप्रमाणें.

६ ते ८ रुद्राभिषेक व सनई चौघडयाची हजेरी नित्याप्रमाणें.

८ ते ११ श्रीचे समाधीस मंगलस्नान, वस्त्रपरिधान व चोपचार पूजा

११ ते १ काल्याचें कीर्तन ह. भ. प. श्री विश्राम बोवा यांचें श्रींचे मशीदींत.

१ ते २ श्रींची दुपारची आरती.

२ ते ४ भोजन.

४ ते ५ श्री आपा माळी यांचें नैत्तिक पुराण.

५ ते ६ संस्थान कमिटींची सभा.

६ ते ७ सायंकाळची श्रीची नैत्तिक आरती.

७ ते १० ग्राम भंडारी भोजन मराठे, माळी, तेली, साळी, कोळी कुंभार, मुसलमान, महार, मांग, वडारी वगैरे.

रात्रीं १० ते २ श्रीची शेजारती व ह. भ. प. विश्रामबोवा यांचें कीर्तन.

## भोजन पान.

बुधवार नवमी ता. १–१०--३० पासून पाहुणे मंडळीं येण्यास सुरवात झाली. त्या दिवशीं दोन्ही वेळां मिळून सुमारें १०० पानें झालीं. गुरुवार दशमी ता. २--१०--३० रोजीं दोन्ही वेळ मिळून सुमारें १६० पानें झालीं.

शुक्रवार एकादशी ता. ३–१०--३० रोजीं फराळाची व जेवणाचीं दोन्ही वेळां मिळून सुमारें २०० पानें झालीं.

शनिवार ता. ४-१०-३० रोजीं दोन्ही वेळां मिळून सुमारें ५०० पानें झालीं.

रविवार ता. ५-१०-३० रोजीं दोन्ही वेळां मिळून सुमारें ८०० पानें झालीं.

बहुतेक मंडळी रविवारीं परत गेली. श्री. बाबासाहेब तर्खड रविवारींच गेले. कांहीं ंडळी ९ तारखेस गेली. रावबहादुर प्रधान १० तारखेस गेले. श्री देव व पुरंदरे १६ तारखेस निघून पुण्यास आले. तेथें श्री आपासाहेब गाडगीळ व सौ. वहिनीसाहेब गाडगीळ यांचेकडून त्यांनीं आणिलेल्या सामानाचा व त्यांच्याकडे आलेल्या मनिऑर्डरींचा व पैशांचा हिशोब घेऊन प्रो. श्री. गणपतराव नरके यांच्या डिव्हिडंड ॅरंटवर सह्या घेऊन श्री. मामा डुबे, शंकरराव शिंदे व श्री रासने यांना मोठ्या घंटेच्या कामाकरतां भेटून ता. १७ रोजीं ठाण्यास आले.

## कोजागरी नवान्न पौर्णिमा व चंद्रग्रहण.

यंदाची कोजागरी शिरडीस श्रीचरणाजवळ यथाविधि व थाटाची झाली. त्या दिवशीं दुपारीं ४ ते ५ पर्यंत श्री देव यांचे श्रीचे समाधीपुढें श्री ज्ञानेश्वरीवर प्रवचन झालें. तसेंच रात्रीं श्रीची पूजा, दूधसाखर, नारळ व पोहे यांचा नैवेद्य ब्राह्मणांस दक्षिणा, द्यूत खेळणें वगैरे होऊन कोजागरीची कथा सर्वांस सांगण्यांत आली. तसेंच दुसरे दिवशीं नवान्न पौर्णिमा व ग्रहण पर्वणी हीं यथाविधि पाळण्यांत आलीं.

## भोजनाचा बेत.

उत्सव दिवसांत भोजनास दोन चटण्या, दोन भाज्या, मीठ, लिंबू, भात, वरण, तूप, पांढरी पोळी, दसऱ्याचे दिवशीं श्रीचे नैवेद्यास च-पक्कान्नें साखरभात व शिरा केला होता. ताक भरपूर होतें. ग्रामभोजन भंडाऱ्यासह सर्वांना शिरा हेंच एक पोटभर पक्कान्न होतें.

## भिक्षा.

यंदाचे उत्सवांत पुण्यतिथीचे मुख्य दिवशीं श्रींचे नामाचा जयघोष करून व्यवस्थापक मंडळींनीं गांवांत भिक्षा मागण्याच्या पूर्व पद्धतीची पुन्हा सुरवात केली.

## अभिषेक.

पवमानाचा अभिषेक करण्यास या रहाळांत कोणी ब्राह्मण न मिळा-ल्यामुळें कार्यक्रमांत छापल्याप्रमाणें उत्सवाचे चारी दिवशीं श्रींचे समाधीवर फक्त रुद्राभिषेकच करण्यांत आला व नंतरही चार दिवस रुद्राभिषेक झाली.

## फुलबाग.

ज्या शिरडींत श्रींचे चरणकमलीं अथवा समाधीवर वाहण्यास एक फूल किंवा एक तुळसीपत्र मिळत नसे त्याच शिरडींत रावबहादुर श्री मोरेश्वरराव प्रधान सांताक्रूझ यांनीं फुलबागेकरतां बरेच वर्षांपूर्वी शिरडी

संस्थानास बक्षिस करून दिलेल्या श्रींच्या लेंडीच्या जागेंत तेथील कांहीं उत्साही मंडळीच्या मदतीनें सुंदर फुलबाग तयार होऊन त्यांत नाना प्रकारचीं यथास्थित फुलें व तुळसी झाल्या आहेत. यंदाचे उत्सवांत याचे श्रींचे बागेंतील फुलें व तुळसी श्रीचे समाधीवर वाहण्यास रोज मनमुराद मिळत. तुळसी तर इतक्या झाल्या आहेत कीं, सौ. श्री वहिनीसाहेब गाडगीळ व मी यांनीं एकेक लक्ष तुळसी श्रींचे समाधीवर वाहिल्या. ही गोष्ट येथें नमूद करण्यास अत्यानंद वाटतो. फुलबागेस जागा देऊन श्रीची याप्रमाणें अखंड सेवा करणाऱ्या सद्भक्तांचें श्री साईमाउली कल्याण करो.

## आभार.

एकंदर उत्सवांत श्री. माधवराव देशपांडे, त्यांचे दोन्ही चिरंजीव, दोन्ही सुशील स्नुषा, पुतणे, तसेंच श्री तात्यापाटील, पुरंदरे, सिताराम पोवार, श्री. सौ. वहिनीसाहेब गाडगीळ, बाळा गुरव व संस्थानची इतर नोकर चाकर मंडळी व गांवांतील व परगांवचीं मंडळी यांनीं हरएक प्रकारें मेहनत घेऊन उत्सव कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पाडला व श्री. ह. भ. प. विश्राम बोवा यांनीं आपल्या सुश्राव्य कीर्तनाची भर टाकून कार्यक्रमास जी शोभा आणिली त्याबद्दल या उत्सवाचे व्यवस्थापक सर्वांचे अत्यंत आभारी आहेत.

## संत भाऊराव कुंभार

श्री. भाऊराव कुंभार, ज्यांना येथील लोक भाऊ किंवा भावडया असेंही म्हणतात, व ज्यांची येथील सर्व गांवकऱ्यांना चांगली माहिती आहे, या उत्सवांत एक दिवस भोजनास आले होते. हे गुप्त संत आहेत. त्यांची वृत्ति निरिच्छ आहे. मनास आल्यास अन्न, कपडा किंवा दक्षिणा मागतात. कोणी दिल्यास घेतातच असें नाहीं. मजजवळ जेवण, दक्षिणा व कपडा मागितला. मी हे जिन्नस त्यांना आनंदानें दिले व त्यांनीं त्याचा स्वीकार केला. दिलेले पदार्थ कांहीं वेळ ठेवतात व नंतर कुत्र्यास, गाढवास, भिकाऱ्यास वाटून टाकतात, तूर्त इतकेंच पुरे.

**जमा**

रु. आ. पै.

०—०—० गेले सालची पुण्यतिथि उत्सवाची शिल्लक.

४२५—०—० श्री बाबासाहेब तर्खड शिरडी सं. खजिनदार यांजकडून खर्चाकरतां घेतलेली अगाऊ रक्कम

४५—०—० गेले साली उत्सवासाठी खरेदी करून ठेविलेले तांदूळ.

७—६—६ भिक्षेचें उत्पन्न.

२५—१—३ उत्सवाचे चार दिवसांत मंदिरांतील व मशिदींतील पेटींत जमलेली रक्कम.

७०३—५—९ उत्सव कार्यासाठी ठिकठिकाणाहून आलेली वर्गणी.

४०८-१०-९ श्री. तर्खड व श्री. नवलकर मार्फत.

३४-८-० श्री. पुरंदरे मार्फत.

९१-३-० श्री. देव मार्फत.

१४७-०-० श्री. बाबुराव बोरावके मार्फत.

५-०-० श्री. तात्याबा पाटील मार्फत.

१५-०-० श्री. गाडगीळ मार्फत.

**खर्च**

रु. आ. पै.

६०६—३—६.

४६—४—० तांदूळ

१००—१—९ तूप

९—६—० गोडें तेल

३७-११-० साखर

१५—९—० गूळ

१५—२—६ रवा

१५—०—० गहूं

८—९—६ तुरीची डाळ

५—४—० चण्याची डाळ

०-१३-६ कणीक

१—०—० तिखट

१—८—० मीठ

०-१५-० खोबरें

२-१४-० केशर

०-१२-० हळद

०—२—६ अमसुलें

१-१०-० मसाला

०—४—० मोहरी

०—५—० चिंच

०-११-९ खिसमिस

०—८—० वेलदोडे

०—१—० खडीसाखर

०—९—३ साबूदाणें

५—४—९ भुंमुगदाणें

३—३—० भगर

०—६—० लिंबें.

०—४—० हिरव्या मिरच्या

०—८—० आलं

६—४—० बटाटें

०-१५-० डांगर

३-११-६ दूध

**जमा.**

| रु. आ. पै. | |
|---|---|
| २-०-० | श्री. सौ. वहिनीसाहेब गाडगीळ मार्फत. |
| ६९८-५-९ | |
| ६-६-० | शिल्लक राहिलेल्या सामानाच्या विक्रीचें उत्पन्न. |
| १२१२-३-६ | |

**खर्च**

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ३-०-० | चहा |
| ०-११-९ | नारळ |
| ०-८-० | पोहे |
| ६-०-० | पत्रावली |
| ६-०-० | द्रोण |
| ३-४-० | भोजन दक्षिणा |
| ९-१४-३ | सर्पण |
| ०-३-० | विडयाचीं पानें |
| ०-१०-३ | सुपारी |
| ०-०-६ | कात |
| ०-८-० | ऊद |
| ०-७-० | कापूर |
| ०-२-० | बुका |
| ०-२-० | काड्या |
| ०-३-० | मुरमुरे |
| ७-२-० | घासलेट |
| १-४-० | बत्तींचें मँटल. |
| ०-६-३ | श्रींचे घोडयास चणे. |
| ५-०-० | श्रींचें पुढें पांच दिवसांचीं दक्षिणा. |
| १-०-० | श्रींचे घोडयास गवत. |
| ०-४-० | केरसुण्या. |
| ११-१३-० | कार्ड पाकिटें व तिकिटें |
| १०-९-० | मोटर भाडें |
| ८-७-० | टांगा, गाडीभाडें |
| १६-८-० | रेल्वे भाडे |
| २-१५-० | हमाली |
| १३-०-० | मजुरी |
| ५६-०-० | आचारी. |
| १-४-० | भंडाराभोजन व आचारी. |

## खर्च

| रु. आ. पै | |
|---|---|
| ५५-१२-९ | कीर्तन, विठ्ठलमंदीर, पोस्त, देणगी वगैरे |
| ३—७-० | श्रीचे नैवेद्यास पेढे. |
| ४-१०-० | श्रींस हार शेरे. |
| १—०-० | दसऱ्याची शामसुंदरास ओंवाळणी. |
| २—८-० | प्रसाद पिशव्यांचें कापड. |
| १—०-० | पिशव्या शिलाई. |
| ०—३-३ | निशाण शिलाई. |
| २—०-० | दळणमजुरी. |
| १-१०-० | परीट धुलाई |
| २९—८-० | पुण्यतिथि जाहिरात खर्च वगैरे. |
| ४—६-० | भिक्या रूंजा यास कपडे. |
| १-११-० | श्री. भाऊराव कुंभार यांना कपडे. |
| ४—०-० | अभिषेक दक्षिणा. |
| ८—०-० | तांदूळ आणण्याचें रेल्वे भाडें |
| ०-१०-० | मोलकरीण. |
| ४-१५-६ | किरकोळ. |
| ६०६-३-६ | |
| ४२५-०-० | श्री बाबासाहेब यांजकडून खर्चाकरितां अगाऊ आणिलेली रक्कम परत. |
| १०३१—३-६ | |
| १८१—०-० | शिल्लक |
| १२१२—३-६ | |

## शके १८५२ सालच्या पुण्यतिथि उत्सवाकरितां वर्गणी पाठविणाऱ्या सद्भक्तांचीं नांवें व रकमा.

अढिया भगवंत त्रिभुवन डहाणू २५-४-०
अढिया त्रिभुवन नरोत्तम डहाणू ५-०-०
आचरेकर बी. एल. कुर्डुवाडी १०-०-०
आचरेकर केशव गणेश बेळगांव १५-०-०
इराणी आरदेशर नामदार दादर १०-०-०
उपलप नारायण पिलाजी सोलापूर ८-०-०
उपासनी बहालकर रावजी बाळकृष्ण धुळें २-०-०
ओक जयराम नारायण मुंबई ५-०-०
श्रीमती पार्वतीबाई ओझरकर ठाणें ३-२-०
करंदीकर जनार्दन धोंडदेव उर्फ अण्णासाहेब डहाणू ५-०-०
करंदे भास्कर व्ही. मुंबई ३-०-०
करंदे श्रीपाद मंगेश मंगेशी ५-०-०
कर्णिक बळवंत हरी वांद्रें ५-०-०
कर्णिक मोरेश्वर हरी अंधेरी १०-०-०
कर्णिक भालचंद्र टी. कल्याण ५-०-०
कर्णिक शंकर सीताराम अलिबाग १०-०-०
कावजी एम. आर. मुंबई १-०-०
किबे सरदारसाहेब एम.व्ही.इंदूर ५-०-०
किराणे महादेव पुरुषोत्तम सातारा ५-०-०

१३७-६-०

१३७-६-०
कुडाळकर सदानंद भास्करराव वांद्रें १-०-०
कीर्तने मधुकर दामोदर इंदूर १०-०-०
